Reg. No.PHM/SR/5/VIII/06

# लोकसत्ता

३ रुपये • पुणे, शुक्रवार, १४ मे २०१० • वर्ष २३ • अंक ६६ • पृष्ठे १० + वृत्तान्त

## पद्मजा फेणानींची रविवारी अक्कलकोटमध्ये 'भक्तिसंगीत संध्या'

सोलापूर, १३ मे /प्रतिनिधी

अग्निहोत्राचा जगभरात प्रसार केलेले अक्कलकोटच्या शिवपुरीनिवासी श्री गजानन महाराजांच्या १३ व्या जन्मोत्सवानिमित्त येत्या रविवारी १६ मे रोजी श्री क्षेत्र शिवपुरी येथे रात्री नऊ वाजता प्रसिध्द गायिका पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्या भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम आयोजिला आहे.

या महोत्सवात श्री गजानन महाराजांचे देश-विदेशातील सुमारे पाचशे भक्तगण अक्कलकोट येथे शिवपुरीत येऊन स्वच्छता व इतर माध्यमातून सेवा करणार आहेत. पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्या भक्तिगीतांच्या कार्यक्रमात वाद्यसंगत त्यांचेच सहकारी कलांवत करणार आहेत. याबाबतची माहिती श्री गजानन महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने जितेंद्रकुमार जाजू यांनी पत्रकार परिषदेत सांगितली. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

महाराजांच्या जन्मवेळेपर्यंत म्हणजे रात्री १२.४२ पर्यंत भक्तिसंगीत, आराधना असे कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय दिवसभर गणेशयाग, महामृत्युंजय मंत्राचे हवन आदी कार्यक्रम होणार असून दि. १७ रोजी 'श्री'ची महापूजा झाल्यानंतर तमाम भक्तांना महाप्रसादाचा लाभ घेता येईल, असे जाजू यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस विद्याधर पारखे व विठ्ठल ऊर्फ दादा शिरशीकर, राजेश पाटील आदी उपस्थित होते.